नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा



मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४७९ वा ● गुरुवार, ता. २५ डिसेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००


## येशू म्हणजे प्रेम...

येशू ख्रिस्त म्हटले की आठवतात प्रेम करुणा आणि क्षमाशीलता.धर्माच्या आणि देशाच्या सीमा ओलांडून येशू त्यामुळेच जगभर पोहोचले. ओशो रजनीश यांनी येशूची एक सुंदर कथा सांगितली. येशू किती क्षमाशील आहेत हे ते जिवंत असताना सर्वांना माहीत झाले होते पण त्या काळात फोटोग्राफी नसल्याने येशू दिसतात कसे हे मात्र लोकांना माहीत नव्हते. येशू एकदा एका गावात गेले व तेथे दगडावर बसले होते. तेवढ्यात एक कुत्रे तिथे आले आणि त्यांचा चावा घेतला. पायातून रक्त येवू लागले. कडेला गर्दी जमा झाली. येशू शांत होते. त्यांनी कुत्र्याच्या डोक्यावरून हात फिरवला आणि म्हणाले या कुत्र्याचे दात किती चमकदार आहेत....हे ऐकताच गर्दीतला एका माणसाने विचारले ''तुम्ही येशू आहात का ?'' येशू हो म्हणाले . गर्दीतल्या माणसाने त्या व्यक्तीला विचारले की तुम्ही कसे काय ओळखले ? तेव्हा त्या व्यक्तीने दिलेले उत्तर नितांतसुंदर आहे . तो म्हणाला '' चावणाऱ्या कुत्र्यावर न चिडता उलट त्याच्या चमकदार दातांचे कौतुक करणारी व्यक्ती ही येशूच असली पाहीजे '' किती सुंदर आहे ही कथा ..एखाद्या मुल्यासाठी तुम्ही ओळखले जावेत ही जगण्याची येशूची उंची आपल्याला ही प्रेम आणि करुणेची महती सांगते म्हणून येशू सर्व धर्मातल्या लोकांना आपले वाटतात...



येशू मधील प्रेमाचे हे गारूड मला विलक्षण ओढ लावणारे वाटते. ज्याने आपल्याला त्रास दिला त्याच्याही सद्गुणांची स्तुती करणे त्याला कोणतीही शिक्षा न करणे किंवा त्याचा कोणताही द्वेष न करणे हे येशूचे मूल्य मला हलवून टाकते.. आणि म्हणून ही कथा मी दर नाताळ मध्ये आवर्जून सोशल मीडियामध्ये सर्वत्र पाठवतो....

पण हे येशूचे विचार असताना आज देशात जे काही सुरू आहे, द्वेष आज धर्माचा पाया बनतो आहे की काय असे वाटावे असे आजचे दिवस आहेत.. धर्म आणि द्वेष हे समानार्थी शब्द आहेत का ? असा एक प्रश्न मनामध्ये घेऊन जातो .सर्व धर्मातील महापुरुषांनी हाच संदेश दिला आहे आणि त्यांना ज्यांनी त्रास दिला त्यांना त्यांनी माफ केले आहे.. संत ज्ञानेश्वरांना लहानपणी इतका त्रास दिला त्यांच्या आई-वडिलांना तर देहांत प्रायश्चित घेण्यास सांगितले पण तरीही ज्ञानेश्वरी मध्ये ज्यांनी त्यांना त्रास दिला त्यांच्याबद्दल संत ज्ञानेश्वर अक्षरही बोलत नाहीत.. संत एकनाथ यांच्या क्षमाशीलतेच्या गोष्टी तर प्रसिद्ध आहेत. तुकारामांपासून सर्व संतांना असाच त्रास झाला पण तरीही या सर्वांनी आपल्याला त्रास देणाऱ्यांना क्षमा केली. त्यामुळे क्षमा हाच धर्म आहे की काय असा प्रश्न पडावा इतके सर्वधर्मातील संताने महापुरुष हे क्षमाशील आहेत पण आज एका विशिष्ट धर्माच्या व्यक्तींना लिंचिंग मध्ये मारले जाते.. फादर स्टेन्स यांना ज्याप्रकारे जाळले गेले त्या वेदना अजूनही मनातून जात नाही. इतकेच कशाला नुकतेच बांगलादेशमध्ये ज्या प्रकारे विशिष्ट धर्मियांना लक्ष्य केले जात आहे ते दुःखद आहे.. भारताच्या फाळणीपासून क्रिया आणि प्रतिक्रिया हा खेळ अजूनही संपत नाही.. गुजरातच्या दंगलीनंतर न्यूटनचा नियम सांगत या रक्तरंजित कृतिला प्रतिष्ठा दिली गेली हे तर अत्यंत दुःख द. आहे आणि म्हणून या धर्मात काही लोकांनी असे केले त्या धर्मातील लोकांनी तसेच केले हा हिशोब मांडण्यापेक्षा त्या पलीकडे जाण्याची प्रेरणा आपल्याला येशूने पिसाळलेल्या कुत्र्याला माफ करून दातांची चमक दाखवली म्हणूनच येशू आज पुन्हा पुन्हा आठवतात बाबा आमटे यांना जेव्हा मी भेटलो होतो तेव्हा नुकतीच गुजरातची भीषण दंगल झाली होती. ती बाबांना म्हणालो हे नेमके काय आहे हे कसे समजायचे बाबा म्हणाले होते मी मानव जातीला असे अधून मधून झटके म्हणजे फिट्स येत असतात पण तो मानवाचा मूळ स्वभाव नाही.. प्रेम हा माणसाचा स्वभाव आहे ..तेव्हा प्रेमाचा उपचार करून माणसांना बरे करावे लागते ..हेच येशूनी जगुन दाखवले.




हेरंब कुलकर्णी
८२०८५८९१९५


(लेखक जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणतज्ज्ञ आहेत.)

# नाताळ म्हणजे सेवाभाव आणि कृतज्ञतेचा उत्सव- डॉ.पठारे

### ग्रामीण भागातील सेवाभावी याजकांचा सन्मान करत पीस फाउंडेशनने जपली नाताळची भावना

**अहमदनगर । रयत समाचार**

पीस फाउंडेशनच्या वतीने नाताळ सणाचे औचित्य साधून ग्रामीण भागात निस्वार्थपणे सेवाकार्य करणाऱ्या याजकांच्या कार्याला सलाम करण्यासाठी एक विशेष कृतज्ञता व सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध राहून निष्ठेने कार्य करणाऱ्या याजकांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे



कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. विविध चर्चमधील याजकांनी एकत्र येत नाताळ सणाचा आध्यात्मिक आणि सामाजिक अर्थ अधोरेखित केला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे उपस्थित होते. यावेळी माउंट सिनाय स्कूलचे संस्थापक डॉ. श्याम खरात, सेंट सेव्हीअर्स चर्चचे प्रमुख याजक रेव्ह. जे. आर. वाघमारे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथील विनायकराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यायाचे इंग्रजी विषयाचे विभाग प्रमुख व पीस फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मार्क सोनावणे, जेष्ठ आचार्य रेव्ह. डी. डी. सोनवणे, सॅम्युअल वाघमारे यांच्यासह ग्रामीण भागातील अनेक याजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सुरेश पठारे यांच्या हस्ते उपस्थित याजकांना भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या.

आपल्या मनोगतात डॉ. सुरेश पठारे म्हणाले की, नाताळ सण हा केवळ आनंद साजरा करण्यापुरता मर्यादित नसून, इतरांच्या जीवनात आनंद, आशा आणि आधार निर्माण करण्याचा संदेश देतो. येशू ख्रिस्तांनी आपले संपूर्ण जीवन समाजाच्या कल्याणासाठी समर्पित केले. देवाचा पुत्र असूनही त्यांचा जन्म एका साध्या गोठ्यात झाला, यातून त्यांनी नम्रता, त्याग आणि प्रेमाचा आदर्श समाजासमोर ठेवला. आजच्या काळातही या मूल्यांची नितांत गरज आहे. त्यामुळे नाताळ सणाचा खरा अर्थ इतरांच्या सेवेमध्ये आणि त्यांच्या आनंदात सहभागी होण्यात आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

रेव्ह. जे. आर. वाघमारे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पीस फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मार्क सोनवणे यांचे वडील स्वर्गीय रेव्ह. एल. बी. सोनवणे हे देखील एक आदर्श याजक होते. त्यांनी अनेक वर्षे ग्रामीण भागात प्रामाणिक सेवाकार्य केले. गरजू, दुर्बल आणि वंचित घटकांसाठी ते नेहमीच मदतीसाठी पुढे असायचे. त्यांच्या या सेवाभावी वृत्तीमुळे अनेक कुटुंबांना आधार मिळाला. स्व. रेव्ह. एल. बी. सोनवणे यांचा समाजसेवेचा वारसा आज डॉ. मार्क सोनवणे पुढे नेत असून, याच भावनेतून या सन्मान कार्यक्रमातील भेटवस्तूंचे नियोजन त्यांनी स्वतः च्या खर्चातून केले असल्याचे त्यांनी सांगितले.

पीस फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मार्क सोनवणे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील याजक हे समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत. ते केवळ धार्मिक मार्गदर्शन करत नाहीत, तर अनेक वेळा सामाजिक, शैक्षणिक आणि मानवीय प्रश्नांवरही पुढाकार घेतात. देवाच्या सेवकांनी समाजासाठी दिलेल्या या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि त्यांचा सन्मान करणे हे नाताळ सणाचे खरे सार आहे, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी आपल्या वडिलांचे, स्व. रेव्ह. एल. बी. सोनवणे यांचे स्मरण करत त्यांच्या सेवाभावी कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुणे डॉ. श्याम खरात यांनी पीस फाउंडेशनच्या विविध सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. ग्रामीण भागातील याजकांसाठी अशा प्रकारचा सन्मान सोहळा आयोजित करणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले. पीस फाउंडेशनने जेष्ठ नागरिक, महिला आणि वंचित घटकांसाठी राबवलेले उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान प्रार्थना, संदेश आणि अनुभवकथनातून नाताळ सणाचे सामाजिक व मानवी मूल्य अधिक प्रभावीपणे अधोरेखित झाले. ग्रामीण भागातील याजकांनीही आपल्या सेवाकार्याचे अनुभव सांगत समाजातील आव्हाने आणि त्यावर केलेल्या कार्याची माहिती दिली, ज्यामुळे कार्यक्रम अधिक भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.

प्रास्ताविक पीस फाउंडेशनचे सचिव सॅम्युअल वाघमारे यांनी केले. त्यांनी फाउंडेशनच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेत संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. हा कृतज्ञता कार्यक्रम ग्रामीण भागातील याजकांसाठी एक संस्मरणीय आणि प्रेरणादायी अनुभव ठरला. अशा उपक्रमांमुळे सामाजिक एकोपा, सेवाभाव आणि मानवी मूल्यांना नवी दिशा मिळते, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. पीस फाउंडेशनचा हा उपक्रम समाजासाठी मार्गदर्शक ठरेल, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

# जैतूनाची झाडे : महाराष्ट्राच्या भूमीवर रुजलेली शांती, विश्वास आणि आशेचे प्रतिक

### पवित्र भूमीची अनुभूती व शांतीचा वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करणारे डॉ. मार्क सोनावणे

जैतूनाचे झाड हे केवळ एक वृक्ष नाही. ते ख्रिस्ती विश्वासानुसार इतिहास, शांती, विजय व भरभराट यांचे प्रतीक आहे. पवित्र शास्त्रामधील अनेक संदर्भ, येशू ख्रिस्तांचे जीवनकार्य आणि इस्त्रायल देशाच्या पवित्र भूमीशी जोडलेले हे झाड आज महाराष्ट्राच्या भूमीत रुजत आहे, ही बाब पर्यावरणीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथील विनायकराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यायाचे इंग्रजी विषयाचे विभाग प्रमुख व पीस फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मार्क सोनावणे यांच्या दूरदृष्टीतून हा अनोखा उपक्रम साकार झाला आहे. पवित्र शास्त्रात उल्लेख अनेक ठिकाणी उल्लेख असलेल्या जैतून झाडांचे रोपण डॉ. मार्क सोनावणे यांनी महाराष्ट्रातील विविध चर्च व ख्रिस्ती संस्थांच्या परिसरात करण्यात आले. ही रोपे म्हणजे फक्त हिरवळ वाढवणारी साधी झाडे नसून, ती ख्रिस्ती शांतीची आणि इस्त्रायलच्या विजयाची व भरभराटीची जिवंत साक्ष आहेत. इस्त्रायल ही ख्रिस्ती धर्मासाठी अत्यंत पवित्र भूमी आहे. याच भूमीत प्रभू येशू ख्रिस्तांनी प्रेम, क्षमा, त्याग आणि शांतीचा संदेश दिला. जैतूनाचे झाड हे इस्त्रायल देशाचे राष्ट्रीय वृक्ष मानले जाते. अशा पवित्र भूमीतील जैतूनाची रोपे महाराष्ट्रात लावली जाणे, म्हणजे पवित्र भूमीचा एक अंशच आपल्या मातीत रुजवण्यासारखे आहे. भारतातील राजस्थानमध्ये बहुतांश जमीन नापीक असल्याने तेथील सरकारने पुढाकार घेवून इस्त्रायलमधील कृषी तंत्रज्ञ यांच्याशी संपर्क करून इस्त्रायलमधील हजारो जेतून झाडे भारतात आणून ती तज्ञ लोकांच्या मार्गदर्शनाखाली ती लावण्यात आली. त्याज प्रमाणे स्थानिक लोकांना याबाबत प्रशिक्षित केले गेले. यासाठी स्वत्रंत्र राजस्थान ओलीव्ह कल्टीवेशन लिमिटेड (राजस्थान सरकारचा उपक्रम) ची २००७ मध्ये स्थापन



केली गेली. शेतकऱ्यांना या झाडांचे रोपे वाटण्यात आली, यामुळे हि झाडे राजस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात लावण्यात आल्यामुळे नापिकीचा सामना करणारे राजस्थानमधील बरेच शेतकरी आत्मनिर्भर झाले. जेतुनाच्या झाडाच्या फळापासून तेल व लोणचे तयार केले जाते. याचे महत्व समजून डॉ. मार्क सोनावणे यांनी त्यांच्याशी संपर्क करून हि झाडांचे रोपे खरेदी करून महाराष्ट्रात आणले व वेगवेगळ्या चर्च व ख्रिस्ती संस्थाना विनामुल्ये भेट म्हणून दिली. त्यामुळे स्थानिक ख्रिस्ती समाजाला पवित्र भूमीशी भावनिक आणि आध्यात्मिक पातळीवर जोडणारा एक दृढ दुवा निर्माण झाला आहे. ही झाडे जिथे लावली गेली आहेत, त्या प्रत्येक चर्च परिसरात त्या जागेला एक वेगळेच महत्व प्राप्त झाले आहे. रोपणानंतर या जैतूनाच्या झाडांची निगा आणि संवर्धन अत्यंत निष्ठेने करण्यात आले. पाण्याची योग्य व्यवस्था, आवश्यक खतांचा वापर, नियमित देखभाल याकडे विशेष लक्ष दिले गेले. डॉ. मार्क सोनावणे यांनी स्वतः या झाडांच्या वाढीकडे लक्ष दिले, अनेकवेळा त्यांनी स्वतः प्रत्येक ठिकाणी जाऊन या झाडांची कटिंग करणे, पाणी देणे हि कामे केली, ही बाब त्यांच्या समर्पणाची साक्ष देते. झाडाची प्रत्येक पालवी जणू विश्वासाचे नवे रूप आहे आणि प्रत्येक पान शांततेचा संदेश देणारे आहे. आज ही जैतूनाची झाडे महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाजासाठी जिवंत प्रार्थनेसारखी उभी आहेत. ती येशू ख्रिस्तांच्या अस्तीवाची व उल्लेख असलेल्या वाचनाची आठवण करून देतात. जैतूनाचे झाड दीर्घायुषी असते. अनेक शतके ते तग धरून उभे राहते. त्यामुळे आज लावलेली ही झाडे येणाऱ्या पिढ्यांसाठी एक अमूल्य वारसा ठरणार आहेत. भविष्यातील पिढ्या जेव्हा या झाडांकडे पाहतील, तेव्हा त्यांना आपल्या ख्रिस्ती परंपरेची, पवित्र भूमीशी असलेल्या नात्याची आणि शांतीच्या संदेशाची आठवण होईल. ही झाडे पुढील पिढ्यांना केवळ धार्मिक इतिहासच सांगणार नाहीत, तर पर्यावरणाचे महत्त्व, संवर्धनाची जबाबदारी आणि मूल्याधिष्ठित जीवनाची शिकवणही देतील. आपले वडील स्व. एल. बी. सोनावणे यांनी दिलेली ख्रिस्ती मुल्ये डॉ. मार्क सोनावणे पुढे घेवून जात आहे, यासाठी त्यांचे कुटुंबाची साथ लाभली, त्यांची पत्नी वंदना सोनावणे, मुले डॉ. तेजल व अनोष यांनी यासाठी पुढाकार घेतला. त्याच्या असीम श्रद्धा, दूरदृष्टी आणि समर्पणामुळेच हा उपक्रम साकार झाला. त्यांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्राच्या भूमीवर अनेक चर्चच्या अंगणात आज जैतूनाची पवित्र झाडे डोलत आहेत. ही झाडे शांततेचा, आशेचा व ख्रिस्ती विजयाचा जिवंत संदेश देत आहेत. हा उपक्रम ख्रिस्ती समाजाला केवळ पवित्र भूमीशी जोडत नाही, तर प्रेम, शांती आणि एकतेचा चिरंतन संदेश समाजात रुजवतो. आजच्या अस्थिर, तणावग्रस्त काळात अशा उपक्रमांची नितांत गरज आहे. जैतूनाची झाडे आपल्याला शांत राहण्याची, एकमेकांशी प्रेमाने वागण्याची टिकवून ठेवण्याची सतत आठवण करून देत राहतील.

**बायबलमधील जैतूनाच्या झाडाचे महत्त्वपूर्ण संदर्भ** – १. शांती आणि नवीन आरंभाचे प्रतीक, नोहाचा प्रसंग (उत्पत्ति ८:११) महाप्रलयानंतर, नोहाने सोडलेल्या कबुतराने आपल्या चोचीत जैतूनाचे पान आणले. हा प्रसंग देवाच्या कोपाचा अंत, पृथ्वीवरील विनाशानंतर आलेली शांती आणि नव्या जीवनाची सुरुवात यांचे प्रतीक मानला जातो. आजही जैतूनाचे पान शांतीचे सार्वत्रिक प्रतीक म्हणून ओळखले जाते.२. देवाची निवड आणि आशीर्वाद, स्तोत्रसंहिता ५२:८ ''मी देवाच्या घरात हिरव्यागार जैतूनाच्या झाडासारखा आहे.'' हा उल्लेख विश्वासू माणसाच्या स्थिरतेचे, देवाच्या आशीर्वादाखाली असलेल्या जीवनाचे आणि सतत फल देणाऱ्या श्रद्धेचे प्रतीक दर्शवतो. ३. पवित्र अभिषेक आणि देवाची सेवा, निर्गम ३०:२२२५ जैतूनाच्या तेलाचा वापर पवित्र अभिषेकासाठी केला जात असे. याजक, राजे आणि पवित्र वस्तू अभिषिक्त करण्यासाठी हे तेल वापरले जात होते. यामुळे जैतूनाचे झाड देवाच्या सेवेसाठी समर्पण आणि पवित्रतेचे प्रतीक ठरते. ४. प्रकाश आणि देवाची उपस्थिती, निर्गम २७:२०. देवाच्या मंदिरातील दिव्यासाठी शुद्ध जैतूनाचे तेल वापरण्याचा आदेश देण्यात आला होता. हे तेल प्रकाश देत असे, जो देवाच्या उपस्थितीचा, मार्गदर्शनाचा आणि सत्याचा प्रतीकात्मक अर्थ दर्शवतो. ५. येशू ख्रिस्त आणि जैतून पर्वत, गेथसेमनेची बाग (मत्तय २६:३६) जैतून पर्वतावरील गेथसेमनेच्या बागेत येशू ख्रिस्तांनी क्रूसवधापूर्वी प्रार्थना केली. ''गेथसेमने'' या शब्दाचा अर्थच 'तेल काढण्याचे ठिकाण' असा होतो. हा प्रसंग त्याग, वेदना, आज्ञाधारकता आणि देवाच्या इच्छेसमोर समर्पण यांचे प्रतीक आहे. ६. देव आणि मानव यांचे नाते, रोमकरांस पत्र ११:१७२४ प्रेषित पौल यांनी जैतूनाच्या झाडाचा उपयोग रूपक म्हणून केला आहे. या रूपकातून देव आणि विश्वासू लोकांमधील नाते, निवड आणि कृपेची संकल्पना स्पष्ट केली आहे. जैतूनाचे झाड येथे विश्वासाच्या मुळांचे आणि देवाच्या कृपेतील सहभागाचे प्रतीक ठरते. ७. फलदायी आणि स्थिर जीवनाचे चिन्ह, यिर्मया ११:१६ देवाने इस्राएलला ''सुंदर फळांनी भरलेले हिरवे जैतूनाचे झाड'' असे संबोधले आहे. हा उल्लेख देवाच्या लोकांकडून अपेक्षित असलेल्या फलदायी आणि आज्ञाधारक जीवनाचे प्रतीक आहे.





प्रा. सॅम्युअल वाघमारे
८७८८४१२७८०

# बायबलकालीन आणि आधुनिक जनगणना

**नाताळ विशेषांकामध्ये हा आगळावेगळा विषय घेण्यामागे एक महत्त्वाचा उद्देश आहे. तो म्हणजे बायबलमध्ये विशद असलेला कुठलाही विषय कालबाह्य झालेला नसून याउलट तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक विषयाच्या नोंदी आज संदर्भासाठी उपयुक्त ठरू शकतात. ख्रिस्ती विश्वासणारे ख्रिस्त जन्माचा उत्सव म्हणून जगभर नाताळ साजरा करतात. हा उत्सव हा केवळ जन्मोत्सव नसून बायबलमध्ये लिहिल्या गेलेल्या प्रत्येक शब्दाचा विश्वासाने केलेला गौरव व उत्सव आहे.**





बायबल हा केवळ एक धार्मिक ग्रंथ किंवा मनगडत कहाण्या यांचे पुस्तक नाही तर यामध्ये जगाचा इतिहास अत्यंत बारकाव्यांच्या नोंदीसह केलेला आपल्याला आढळतो. जगामध्ये विशेषतः इस्रायलमध्ये असलेल्या घराण्यांच्या तसेच त्यांच्या अनेक पिढ्यांची नावासह आणि वयासह माहिती बायबलमध्ये नमूद केलेली आहे. यामध्ये असलेले सेवक किंवा काही महत्त्वाचे व्यक्तिमत्व यांचा जेव्हा तेथे उच्चार होतो, तेव्हा त्यांच्या नावाबरोबर मागील तीन पिढ्यांचा संदर्भ बायबलमध्ये दिलेला आहे. तो एक अत्यंत ग्राह्य करण्याजोगा पुरावा आणि संदर्भ आहे असे जुन्या आणि नव्या करारात आपल्याला आढळून येते. मध्यपूर्व शिवाय तत्कालीन जगातील अनेक महत्त्वाचे संदर्भ पुराव्यांसह व नोंदी स्पष्ट नोंदणीसह बायबलमध्ये केलेले आढळतात आणि म्हणून बायबलमध्ये तसेच आधुनिक काळातील या विषयातील साम्य किंवा विरोध हा आपल्या अभ्यासाचा विषय असायला पाहिजे. बायबलमध्ये झालेल्या किंवा नोंद केलेल्या महत्त्वाच्या जनगणनेचे उद्देश मागील पार्श्वभूमी याचा विचार केला तर आजच्या काळातही त्याचे लागूकरण आपण अनुभवू शकतो बायबलमध्ये जनगणनेचा उल्लेख जुन्या आणि नव्या करारात आढळतो ज्याचा उपयोग प्रामुख्याने लोकसंख्या मोजण्यासाठी केला जात असे आणि लष्करी किंवा युद्धासाठी उपयोगी असणाऱ्या पुरुषांच्या नोंदी हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. दाविदाने केलेली जनगणना हा त्याचे एक उदाहरण आहे. बायबलमध्ये वेगवेगळ्या वयोगटातील पुरुषांची आणि विशिष्ट गटांची गणती केलेली आढळते बायबलमधील जनगणनेचा उद्देश कर आकारणी आणि सैन्यासाठी लोकांची संख्या मोजण्यासाठी केला गेलेला होता. जुन्या करारात इजराइल आणि यहुदाच्या लोकसंख्येची जनगणना केलेली आढळत. नवीन करारामध्ये येशू ख्रिस्ताच्या जन्माचे वेळी रोमन साम्राज्यामध्ये जनगणना करण्यात आलेली आहे व त्याचा उल्लेख नव्या करारात आहे. पुरोहित गटांचीही गणना या काळात केली जायची. त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे मोजमापही या जनगणनेद्वारे केले जायचे. केवळ पुरुषांची गणना करणे, हे पहिल्या शतकातील जो समाजाच्या संस्कृतीचे प्रतिबिंब आहे, असे आपल्याला दिसून येते. हिब्रू बायबलमध्ये जनगणनेसाठी "मी फकाद" असा शब्द वापरला आहे. याचा उल्लेख दुसऱ्या श मुवेलाच्या पुस्तकांमध्ये आपल्याला आढळतो. उदाहरणार्थ यावाबाने राजाला लोकांच्या संख्येची बेरीज दिली. इजिप्तला गेलेल्या जे कपच्या कुटुंबातील सामान्य मूल्यांकनासाठी देखील जनगणनेचा वापर केला गेला, याचे अनेक संदर्भ या ठिकाणी देता येतात, त्यापैकी महत्त्वाचे उत्पत्ती ४६: २६ ते २७, निर्गम एक ते सात यामध्ये आढळतात. प्रत्यक्षात दोन जनगणना बायबलमध्ये आढळतात. त्यापैकी निर्गमनाच्या पहिल्या अध्यायामध्ये दुसऱ्या वर्षी घेतली गेलेली आहे आणि दुसरा अध्याय २६ मध्ये इजरायली लोक कनान देशात प्रवेश करण्यापूर्वी ३८ वर्षांनी घेतली गेलेली आपल्याला आढळते. वेगवेगळ्या श्रेणीतील तसेच एका विशिष्ट प्रदेशात राहणारे लोकसंख्या शास्त्रीय गटाशी संबंधित अशा लोकांची गणना आपल्याला पवित्र शास्त्रामध्ये दिसते.

येशू ख्रिस्ताच्या जन्माच्या वेळी झालेल्या जनगणनेच्या संदर्भात पवित्र शास्त्र लूकच्या शुभ वर्तमानात आपल्याला १:५ ते ३१ याची पुष्टी करते आणि नंतर त्याच्या जन्माचा संबंध जनगणनेशी जोडला आहे. या दिवसात कैसर ऑगस्टने असा हुकूम केला की, सर्व जगाची नोंदणी करावी. ही पहिली नोंदणी होती आणि क्वेरीनियस सीरियाचा राज्यपाल असताना ती केली गेली. सर्वजण नोंदणी करण्यासाठी आपापल्या गावी गेले तसेच युसेफ देखील गालीलातील नासरत येथील गावापासून येहुदियातील बेतलहेम शहरात गेला, कारण तो दाविदाचा वंशज होता आणि जे ख्रिस्ताचे आई मारिया तिच्याशी त्याचे लग्न ठरले होते आणि तिच्यासह तो नोंदणी करण्यासाठी गेला आणि बेतलहेम शहरांमध्ये येशू ख्रिस्ताचा जन्म झाला. याच्या नोंदी आपल्याला जुन्या करारात आणि नवीन करारात एक वास्तव म्हणून समोर येते.

बायबलमधील दुसरी महत्त्वाचे जनगणना ही आरण्यात करण्यात आली. इस्रायल लोकांच्या वीस वर्षे व त्यावरून अधिक वयाच्या मंडळींना म्हणजे इस्रायलमध्ये युद्ध करण्यास सक्षम असलेल्या सर्वांचे त्यांच्या पितृ कोणाप्रमाणे गनती करण्याचा आदेश मोशे आणि याला आजार याजक यांना देण्यात आला.

ख्रिस्ती विश्वासाप्रमाणे लोकांची गणना करून परमेश्वराने दाखवून दिले की, तो त्यांच्यातील प्रत्येकाची कदर करतो. त्यांची त्यांच्या कुटुंबानुसार त्यांच्या नावानुसार नोंदणी करण्यात आली. अशा प्रकारे ते वैयक्तिकरित्या जिवंत देवाच्या कुटुंबाच्या पुस्तकात नोंदवले गेले आणि प्रत्यक्षात त्या प्रत्येकाला त्याने म्हटले, मी तुला नावाने हाक मारली आहे. तू माझा आहेस. पवित्र शास्त्रातील पहिली जनगणना प्रामुख्याने लष्करी संघटनेसाठी होते, तर त्यांना कनान देशात प्रवेश करून त्याचा ताबा घ्यायचा असेल तर त्यांच्याकडे किती सैन्य आहे आणि ते कसे व्यवस्थित करावे, ही माहिती आवश्यक होती म्हणून ही जनगणना झाली. तर गणनाच्या पुस्तकातील २६ व्या अध्यायात दुसरे एक महत्त्वाचे कारण उघड होते ते म्हणजे कनानांच्या भूमीचे योग्य वाटप करण्यात मदत करण्यासाठी ही जनगणना झाली, जेणेकरून ज्या वंशामध्ये अनेक लोक आहेत त्यांना अधिक जमीन मिळेल.

थोडक्यात आपण पाहतो की बायबलमधील जनगणनेच्या मागील उद्देश हे लोकांची गणना करणे, युद्धासाठी योग्य लोकांचे मोजणी करणे, कर आकारणे तसेच जमिनीचे योग्य वाटप व्हावे यासाठी केलेली आपल्याला आढळून येते.

आधुनिक काळातील जनगणना भारतातील पहिली अपूर्ण जनगणना १८७२ मध्ये लॉर्ड मेओ यांच्या काळात झाली. पहिली अधिकृत आणि समकालीन जनगणना आणि दर दहा वर्षांनी होणारी नियमित जनगणना १८८१ मध्ये लॉर्ड रिपन यांच्या काळात सुरू झाली. स्वातंत्र्यानंतर जनगणना अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार ही गणना केली जाते. ती केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अंतर्गत भारताचे महा रजिस्टर आणि जनगणना आयुक्त यांच्या कार्यालयाद्वारे केली जाते. २०११ मध्ये झालेली जनगणनेनंतर ही पंधरावी राष्ट्रीय जनगणना होती आणि स्वातंत्र्यानंतरची ही सातवी जनगणना होती. या जनगणनेचे घोषवाक्य हमारी जनगणना हमारा भविष्य असे होते. डॉ. सी. चंद्रमावली हे या जनगणनेचे आयुक्त होते. या जनगणनेनुसार एकूण भारताची लोकसंख्या १.२१ अब्ज तर साक्षरता दर ७४.०४. लिंग गुणोत्तर दर हजार पुरुषांमागे ९४० महिला लोकसंख्या घनता ३८२ व्यक्ती प्रती चौरस किलोमीटर अशी आढळून येते. विशेषतः या जनगणनेत प्रथमच बायोमेट्रिक माहिती गोळा करण्यात आली. २०२१ ची जनगणना ही भारतातील पहिली डिजिटल जनगणना होणार होती परंतु कोविड नैसर्गिक आपत्तीमुळे ती पुढे ढकलण्यात आली. सध्याच्या माहितीनुसार सोळावी जनगणना हिमालयीन राज्यांसाठी एक ऑक्टोबर २६ पासून आणि उर्वरित राज्यांसाठी एक मार्च २०२७ पासून सुरु होण्याची शक्यता आहे.



नीलिमा जाधव – बंडेलू
८६०५८०७३७७
neelima.bandellu
@gmail.com

जनगणना ही जनकल्याणाशी संबंधित अशी बाब आहे, याचे कारण भारतामध्ये विविध जाती, धर्म, भाषा, प्रांत विविध प्रांतातील विविध जमाती तसेच शहरी किंवा नागरी ग्रामीण आणि जंगलांमध्ये निवास करणारे आदिवासी असे विविध सामाजिक आणि सांस्कृतिक गट अस्तित्वात आहेस. या सामाजिक सांस्कृतिक गटांबरोबरच आर्थिक गटांचीही नोंदणी जनगणनेमध्ये केली जाते जनगणनेनुसार मिळालेल्या माहितीतून राज्यातील धोरण निश्चिती, सरकारी योजनांची आखणी आणि संसाधनाचे योग्य वाटप यासाठी महत्त्वाची ठरते. जनगणनेद्वारे जमा केलेल्या लोकसंख्या व लिंग, शिक्षण, व्यवसाय आणि इतर सामाजिक आर्थिक स्थितीच्या आकडेवारीचा वापर सरकार विकास योजना आणि धोरण आखणण्यासाठी करते. उदा. आरोग्यसेवा, शिक्षण आणि पायाभूत सुविधा लोकसभेच्या आणि राज्यांच्या विधानसभेच्या मतदारसंघाची पुनर्रचना करण्यासाठी जनगणनेची आकडेवारी आधार म्हणून वापरली जाते. ज्यामुळे लोकसंख्येनुसार योग्य प्रतिनिधित्व सुनिश्चित केले जाते. केवळ सरकारीच नव्हे तर संशोधक, अर्थतज्ञ, खाजगी कंपन्या देखील बाजारपेठेचे विश्लेषण आणि नियोजनासाठी जनगणनेमध्ये मिळालेल्या माहितीचा वापर करतात. भारतातील लोकसंख्या आणि विविध निर्देशांकावरील आकडेवारी आंतरराष्ट्रीय संस्थांना उदाहरणार्थ येऊन आपले शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रगतीचा अहवाल देण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण ठरतात.

थोडक्यात जनगणना हा प्रभावी प्रशासन आणि लोककल्याणकारी राज्यासाठी आवश्यक असलेला पायाभूत डेटा किंवा माहिती देणारा सगळ्यात महत्त्वाचा घटक आहे. आपण पाहतो सामाजिक आणि आर्थिक विश्लेषण जनगणनेमुळे समाजातील विविध वर्ग, जाती-धर्म, वंचित गटांचे सामाजिक आणि आर्थिक स्थिती समजण्यासाठी जनगणनेची मदत होते. आरक्षणाची धोरणे आणि विशेषतः जातनिहाय जनगणनेमुळे इतर मागासवर्गीय यांच्या म्हणजे ओबीसी आणि इतर वंचित समुदायांच्या अचूक लोकसंख्येचा अंदाजे येतो. त्यामुळे भारतामध्ये सध्या जातीवर जनगणनेचा विषय ऐरणीवर असून कोविडकाळामध्ये पुढे ढकलली गेलेली जनगणना लवकरच केली जाणार आहे. जातीवर जनगणनेचा प्रश्न अत्यंत क्लिष्ट असून भारतातील प्रत्येक जाती समूहाला द्यावयाचे आरक्षण या संदर्भात वेगवेगळे मतप्रवाह अस्तित्वात आहेत, जातीवर जनगणनेमुळे यापुढील काळामध्ये भारतातील वंचित, भटके आणि सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक न्यायापासून वंचित राहिलेल्या समूहाची माहिती अतिशय प्रखरपणे समोर येण्याची शक्यता असल्यामुळे या पद्धतीच्या जनगणनेला राजकीय विरोध होत आहे. जनगणना कशा पद्धतीने केली जावी, यावर विविध मतप्रवाह असले तरी देखील पुढील दोन वर्षात होणाऱ्या जनगणनेच्या वेळी जातीवर जनगणना झाल्यास त्याचे दीर्घकालीन परिणाम भारताच्या सामाजिक आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक घटकांवर होणार आहेत, हे नक्की.

बायबलकालीन जनगणना आणि आधुनिक काळातील विशेषतः भारतातील जनगणना या दोन विषयांचा तौलनिक अभ्यास केल्यास आपल्या एक लक्षात येते की, जनगणना ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून एकूणच समाजातील सामाजिक स्तर त्यांची तत्कालीन परिस्थिती समजून घेऊन देश चालविण्यासाठी लागणारी धोरणे आखण्यास जनगणनेचा उपयोग होतो, असे आपणास आढळून येते.

येत्या वर्ष दीड वर्षात होणारी ऐतिहासिक जनगणना याबाबत आपण प्रत्येकाने जागरूक राहून या देशाचे नागरिक म्हणून आपली नोंद व प्रतिनिधित्व याकडे गांभीर्याने लक्ष देऊया आणि निवडणुका व मतदान जितक्या जितक्या गांभीर्याने आपण घेतो तितक्याच गांभीर्याने जनगणना ही घेऊया.

## मानवाच्या उद्धारासाठी अवतरलेली देवाची प्रीती म्हणजे नाताळ

देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. (योहान ३:१६) हे वचन केवळ धार्मिक विधान नसून, संपूर्ण नाताळ सणाचा आत्मा आणि केंद्रबिंदू आहे. मानवावर असलेले देवाचे अमर्याद प्रेम, त्याग आणि करुणा याचे मूर्त स्वरूप म्हणजे प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्म. नाताळ हा सण येशूच्या जन्मदिनाच्या स्मरण म्हणून साजरा केला जातो. 'नाताळ' हा शब्द लॅटिन भाषेतील नातूय या शब्दापासून निर्माण झाला असून त्याचा अर्थ 'जन्म' असा होतो. इंग्रजी भाषेत याला 'ख्रिसमस' असे संबोधले जाते. दरवर्षी २५ डिसेंबर रोजी संपूर्ण जगात हा सण आनंद, उत्साह आणि श्रद्धेने साजरा केला जातो. गुलाबी थंडी, सजलेली बाजारपेठ, रोषणाई, कॅरोल गीतं, भेटवस्तू आणि शुभेच्छा यामुळे वातावरण आनंदमय होते. मात्र या बाह्य आनंदामागे दडलेला नाताळचा खरा अर्थ अनेकदा दुर्लक्षित राहतो. म्हणूनच नाताळ सणाचा मूळ संदेश समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. येशूचा जन्म का झाला, या प्रश्नाचे उत्तर म्हणजे मानवाप्रती देवाची अथांग प्रीती. देव हा संपूर्ण सृष्टीचा निर्माणकर्ता आहे. त्याने मानवाची निर्मिती केली, परंतु हाच मानव पापाच्या मार्गावर गेला आणि देवापासून दूर झाला. पापामुळे जगात द्वेष, अन्याय, हिंसा, शोषण आणि दुःख वाढले. तरीही परमेश्वराने मानवावर क्रोध किंवा नाश ओढवून न देता, त्याच्या तारणाचा मार्ग निवडला. मानवाचा नाश होऊ नये, तर त्याला नवजीवन मिळावे, यासाठी देवाने आपला एकुलता एक पुत्र या जगात पाठविला. येशूचा जन्म हा कोणताही योगायोग नव्हता, तर दैवी योजनेनुसार आधीच शास्त्रलेखांत भविष्यवाणी केलेली ऐतिहासिक घटना होती. (यशया ९:६) मानवी दृष्टिकोनातून पाहिले तर पापी मानव देवाच्या न्याय आणि शिक्षेला पात्र होता. परंतु परमेश्वराने शिक्षा नव्हे, तर क्षमा निवडली. शाप नव्हे, तर आशीर्वाद दिला. नाताळ म्हणजे देवाने मानवावर दाखवलेली ही अनन्यसाधारण कृपा आहे. म्हणूनच प्रीती आणि क्षमा या परमेश्वराच्या सर्वात मोठ्या शिकवणी आहेत. पुढे चालून याच येशू ख्रिस्ताने मानवाच्या उद्धारासाठी क्रूसावर आपले जीवन अर्पण केले. ''याहून मोठी प्रीती कोणाचीच नाही, की कोणी आपल्या मित्रांसाठी आपले प्राण देईल.'' (योहान १५:१३) या वचनातून देवाच्या प्रीतीतील त्याग स्पष्टपणे दिसून येतो. त्यामुळे नाताळ आपल्याला केवळ आनंद नव्हे, तर त्याग, क्षमा आणि सेवाभाव अंगीकारण्याचे आवाहन करतो. येशूच्या जन्माची घटना अत्यंत साधी, पण अर्थपूर्ण आहे. रोमन सम्राटाच्या आदेशानुसार जनगणनेसाठी येशूचे आई-वडील, योसेफ आणि



मरीया, आपल्या मूळ गावी बेथलेम येथे आले. त्या वेळी मरीयेच्या बाळंतपणाची वेळ जवळ आली होती. परंतु त्यांना कुठेही निवास मिळाला नाही. अखेरीस एका गाईच्या गोठ्यात त्यांना आसरा मिळाला आणि तेथेच येशूचा जन्म झाला. ज्याने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली, त्या देवाने आपल्या पुत्राच्या जन्मासाठी राजवाडा नव्हे, तर गोठा निवडला. यामागे देवाची नम्रता, लीनता आणि मानवाशी एकरूप होण्याची तयारी दिसून येते. ''तो देवस्वरूपाचा असूनही, देवासारखे होणे हक्काचे मानले नाही, तर स्वतःला रिकामे करून दासाचे रूप घेतले.'' (फिलिप्पैकर २:६-७) प्रभू येशूच्या जन्माची सुवार्ता सर्वप्रथम राजांना किंवा धर्मगुरूंना नव्हे, तर मेंढपाळांना देण्यात आली. त्या काळातील समाजात मेंढपाळ हे वंचित, दुर्लक्षित घटक मानले जात. तरीही देवदूतांनी त्यांनाच सर्वप्रथम आनंदाची बातमी दिली. मेंढपाळांनी विश्वास ठेवून बाळ येशूचे दर्शन घेतले. ही घटना सामाजिक न्यायाची आणि समतेची पहिली पायरी ठरली. देवाच्या दृष्टीने कोणीही लहान किंवा मोठा नाही, हा संदेश नाताळ देतो. बायबलमध्ये असे म्हटले आहे की, ''मनुष्याचा पुत्र हरवलेल्यांना शोधण्यासाठी आणि त्यांना तारण्यासाठी आला आहे.'' (लूक १९:१०) त्या काळातील तथाकथित पापी म्हणजे गरीब, आजारी, पीडित, बहिष्कृत आणि वंचित लोक होते. समाजाने ज्यांना दूर लोटले, त्यांच्याजवळ येशू गेला. त्याने भुकेल्यांना अन्न दिले, आजाऱ्यांना बरे केले, दुःखितांचे अश्रू पुसले आणि आशाहीनांना नवी आशा दिली. त्यामुळे नाताळ सण आपल्याला सेवेचा संदेश देतो. गरजूंच्या वेदना समजून घेणे, अनाथांना आधार देणे, अंधाऱ्या आयुष्यात आशेचा दिवा बनणे, हीच नाताळची खरी भावना आहे. आजही जग युद्ध, द्वेष, दारिद्र्य आणि अन्यायाने ग्रस्त आहे. अशा परिस्थितीत नाताळचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. नाताळ आपल्याला आठवण करून देतो की प्रीती ही सर्वश्रेष्ठ आहे. ''प्रीतीशिवाय मी काहीच नाही.'' (१ करिंथकर १३:२) म्हणून नाताळ म्हणजे केवळ एक दिवस साजरा करणे नव्हे, तर वर्षभर येशूच्या शिकवणीप्रमाणे जगण्याचा संकल्प करणे आहे. मानवाचा नाश होऊ नये म्हणून परमेश्वराने आपल्या पुत्राला या जगात पाठवले. ही देवाची मानवतेवरील अखंड आशा आहे. आपण प्रत्येकाने प्रभू येशू ख्रिस्ताच्या प्रीती, क्षमा, नम्रता आणि सेवाभावाची शिकवण आपल्या जीवनात उतरवली, तरच नाताळचा खरा अर्थ साकार होईल. देवाने दिलेली ही प्रीती स्वीकारून ती इतरांपर्यंत पोहोचवणे, हाच नाताळचा खरा उत्सव आहे.

**रेव्ह जे. आर. वाघमारे**
प्रिस्ट इन्चार्ज, सेंट सेव्हियर्स कॅथेड्रल,
नाशिक धर्मप्रांत (CNI).

## नाताळ आनंदाचा सण

नाताळ हा ख्रिस्ती धर्मियांचा आनंदाचा आणि मांगल्याचा सण मानला जातो. दरवर्षी २५ डिसेंबर रोजी संपूर्ण जगात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याच दिवशी येशू ख्रिस्ताचा जन्म झाला होता, सणाच्या दिवशी ख्रिस्ती धर्मातील लोकांच्या घरामध्ये आणि चर्चमध्ये सुंदर सजावट केली जाते. लोक आपल्या घरात ख्रिसमस ट्री लावतात आणि तो दिव्यांनी व भेटवस्तूंनी सजवतात. सांताक्लॉजकडून भेटवस्तू मिळणार ह्या कल्पनेमुळे मुलांमध्ये खूप उत्साह असतो. लोक एकमेकांना शुभेच्छा देऊन भेटवस्तूंची देवाण-घेवाण करतात. बायबलनुसार येशू ख्रिस्ताचा जन्म बॅथलहॅम या गावी एका गोट्यात झाला होता; म्हणून ख्रिस्ती धर्मियांच्या घराबाहेर गोठ्याची प्रतिमा तयार केली जाते.



सुवर्णा गावकर
करमळी, गोवा.

लोक चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करतात व येशू देवाच्या जन्माचे स्मरण करतात. येशूने संपूर्ण समाजाला प्रेम आणि मानवतेची शिकवण दिल्याने त्यांना ख्रिस्ती धर्माचे संस्थापक मानले आहे. ख्रिसमसचा शब्दशः अर्थ आहे क्राइस्ट मास, अर्थात येशूचा जन्मनिम्मित करणारी सामूहिक प्रार्थना. जशी पौर्णिमा आणि अमावस्या या तिथी चंद्रावर अवलंबून असतात तसा प्रकार ख्रिस्ती कालगणनेत नाही. ह्या धर्मात सूर्याला अधिक महत्व दिले जाते. लोक या सणाची तयारी १० दिवस अगोदर सुरू करतात, बाजारातून नवीन कपडे खरेदी, नवीन वस्तू खरेदी तसेच आपल्या घरातील साफसफाई करणे, गोड पदार्थ बनवणे ह्या सगळ्याची तयारी जोरात सुरू असते. २४ डिसेंबरपासून रात्रीची येशूची प्रार्थना कारण्यास सुरुवात केली जाते, ह्या दिवशी काही भाविक उपवास करतात तर देशातील काही आदिवासी आणि खेड्यापाड्यामधील ख्रिस्ती बांधव थोड्या वेगळ्या पद्धतीने हा दिवस साजरा करतात, ह्या लोकांचे खानपान वेगळं असत, रव्यापासून बनवलेला केक व केळी या दोन्ही गोष्टींचा समावेश त्यांच्या आहारात एक महत्त्वाचा भाग असतो. तसेच दक्षिण भारताच्या काही भागात पायसम हा गोड पदार्थ बनवून हा सण साजरा केला जातो. परंपरावादी ख्रिश्चन लोक हा सण प्रार्थना आणि आत्मशुद्धेने साजरा करतात तर रोमन कॅथलिक लोक १ डिसेंबरपासून २५ डिसेंबरपर्यंत फक्त शाकाहारी भोजनाचे सेवन करतात. ज्याप्रमाणे हिंदू धर्मात दिवाळीचा सण तर मुस्लिम धर्मात ईदच्या सणाचे विशेष महत्व आहे तसेच ख्रिश्चन धर्मातील लोकांसाठी नाताळ हा सण विशेष मानला जातो.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# संघर्ष : ख्रिस्त आणि ख्रिस्ती

**ख्रिस्त समजणे किंवा ख्रिस्ती जीवन समजणे कीती सहज सोपे आहे असे तुम्हाला वाटते? ख्रिस्त समजण्यासाठी येशू ख्रिस्ताचा जन्म कोणत्या पार्श्वभूमीवर झाला याचं विस्मरण होत असेल तर ख्रिस्ती जीवन समजणे केवळ अशक्य आहे.**

आम्ही पिढ्यान् पिढ्यांचे जन्माने ख्रिस्ती लोक आहोत. पवित्र शास्त्र आम्ही अनेकवेळा वाचले, ऐकले आहे. कित्येक लोक असे आहेत की, मोठ्या अविर्भावात सांगतात माझे शास्त्राचं अमूक इतक्या वेळा झाले आहे. काही जणांना तर अगदी अनुक्रमणिका पासून शेवटच्या पानापर्यंत शास्त्र मुखोद्गत आहे. परंतु शास्त्र समजून घेणारे किती आणि त्याबरहुकूम वागणारे किती? हा नक्कीच संशोधनाचा विषय ठरेल.



जेव्हा या भूमीवर पातके आणि पातकी वृत्ती यांनी परिसिमा गाठली त्या दरम्यान पितापरमेश्वराने संदेष्टे, राजे, भविष्यवादी अशा अनेकांना पाठवले. परंतु लोकांच्या वृत्तीत फरक पडला नाही तेव्हा देव स्वतः मनुष्य होऊन कुमारीच्या पोटी येशू बाळाच्या रुपात जन्माला. हे भविष्य त्याने स्वतः आहाज राजाला सांगितले. याचा अर्थ मनुष्यांच्या बेपर्वा, उद्दाम, आणि पातकी वृत्तीने अगदी कळस गाठला म्हणून मनुष्यांमध्ये मनुष्य म्हणून जन्म घेऊन मनुष्य देहात देवत्व किंबहुना पातक विरहित आयुष्य जगता येते हे सप्रमाण सिद्ध करण्यासाठीच हा ख्रिस्त जन्म. हे मी मागे एका लेखात देखील सविस्तर लिहिले होते. याचा अर्थ असा की, मनुष्यांच्या अगणित आणि गंभीर पातकांमुळे ख्रिस्त येशूचा जन्म मनुष्य देहात झाला. आमच्यासाठी तारणारा जन्मला हे योग्यच. परंतु आता आम्ही पापांच्या राशी रचायला मोकळे असा त्याचा अर्थ नाही. पूर्वीच्या पातकांचे प्रकार तर आहेतच, उलट त्या नवीन पापांच्या प्रकारांची त्यात भर पडली असे म्हटले तर ते चूक ठरु नये. स्वतः च्या कृत्याचे समर्थन शास्त्रातीलच एखाद्या वाचनाने करण्याचे धाडस हा देखील नवीन प्रकार. मुळात पवित्र शास्त्र सांगते की, ''तुम्ही जगात असता जगासारखे असू नका'' मात्र जग ज्या विचाराने, वृत्तीने वागते तसेच वागून सगळं जगच तसं वागतय अशी मल्लीनथी करणारे महाभाग आहेतच. आई वडीलांची सेवा, विधवा आईचा सांभाळ, आपल्या सोबतच इतरांचा विचार करणे, अनाथ, गरीब, पिडीत रोगी यांचा कैवार घेणे यासारख्या गोष्टी इतिहास म्हणून सांगाव्यात या अवस्थेला आल्या आहेत. मंदिराच्या मालमत्ता विकणारे, दान पात्रात हात घालणारे, अयोग्य गोष्टींनी हात बरबटलेले जेंव्हा ''ख्रिस्ताचे शरीर व रक्त'' सेवन करण्यास पुढे सरसावतात तेव्हा त्यांनी अनेकवेळा विचार करणे क्रमप्राप्त आहे. आपल्या वर्तनाचा पश्चताप आणि त्यास पुरेसे प्रतिफळ देणे इथे अनिवार्य ठरते. दिवसेंदिवस ख्रिस्ती मनुष्याचे जीवन आणि अन्य घटकांचे जीवन यातील फरक नष्ट होताना दिसतो. इथे ख्रिस्ती जीवनातील सहभागासाठी संघर्ष कोणालाच नको आहे. मी मला स्वतः लाच खऱ्या ख्रिस्तीपणाचे प्रमाणपत्र देतो. जीवनातील सकारात्मकता आणि नकारात्मकता यातील भेद संपवण्याचा यथोचितपणे, अगदी स्वतःच्याही नकळत प्रयत्न होताना दिसतो. ख्रिस्ती म्हणायचे परंतू ख्रिस्ती ऐक्य नको. ख्रिस्त म्हणतो ''जशी विटेवर वीट तसे एकमेकांवर रचले जा.'' हे वचन म्हणून पाठ आहे. मात्र ख्रिस्ती लोकांची होणारी अवहेलना, कुचेष्टा, लुटमार, अत्याचार, धर्मद्वेष्टेपणा, मंदिराची धुळधान, मंडळ्यांचं विभाजन, धर्माचा बाजार, दुकानदारी आणि ठेकेदारी, चमत्काराच्या नावाखाली गल्लाभरु वृत्ती या आणि अशाच गोष्टींसाठी याचसोबतच मंडळ्यांचे ऐक्य, विश्वासात वाढ, एकजीनसीपणा, यांसारख्या बाबींच्या पुर्ततेसाठी ख्रिस्ती जनांचे ऐक्य लाखमोलाने गरजेचे आहे. आज असलेल्या स्वभावाविरुद्ध जाऊन या समस्त गोष्टींसाठी सरसावणे हा स्वतःच स्वत:शी होऊ शकणारा संघर्ष आहे. हेच सर्व समजावून सांगण्यासाठी आणि विश्वासणाऱ्यांच्या जीवनात स्वर्गीय शांती मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यासाठीच ख्रिस्त म्हटलेल्या येशूचा जन्म होय.



सॉलोमन गायकवाड
अहमदनगर
ज्येष्ठ पत्रकार
९२२५३२७३०१
७७७३९९९४५०

जेव्हा पवित्र शास्त्र सांगते की, ''जगात पुष्कळ देव आहेत, परंतू जो विशेषेकरुन तुम्हामध्ये वस्ती करीतो तो खरा देव आहे.'' त्याचवेळी पवित्र शास्त्र हे सुद्धा सांगत आहे की, ''सर्व आत्मे देवाचे आहेत. परंतू त्यातील कित्येक बहकून सैतानाच्या मागे गेले आहेत.'' तेव्हा स्वतःच्या मतांशी संघर्ष करुन पहावे लागेल. माझा आत्मा नक्की कुठे आहे? आता काय पुन्हा ख्रिस्ताने जन्म घ्यावा? नाही. आता तो जो येईल ते न्याय करायला.

आधुनिक ज्ञान म्हणते देव नाही. पवित्र शास्त्र म्हणते ''मुढ आपल्या मनात म्हणतो देव नाही'' हा फरक आहे. सद्य स्थितीत आम्ही फक्त ख्रिस्त जन्म स्मरणदिन (ख्रिसमस/नाताळ म्हणून) पाळतो. परंतू खरोखर ख्रिस्त जन्माचा आनंद आम्हाला आमच्या मनात मिळवायचा असेल तर अंर्तबाह्य शुचिर्भूत होणे ही गरज आहे. नाहीतर सणसोहळे होतच राहतील.

# माणुसकी, क्षमा आणि दयेचा संदेश

**नाताळ हा केवळ एक सण नाही, तर मानवजातीच्या इतिहासातील एक महत्त्वाची आध्यात्मिक घटना आहे. प्रभु येशू ख्रिस्तांचा जन्म हा देवाच्या प्रेमाचा जिवंत संदेश घेऊन पृथ्वीवर आला. अंधाराने भरलेल्या जगात प्रकाश बनून अवतरलेला येशू मानवाला माणुसकी, क्षमा आणि दयेचे खरे रूप दाखवतो. नाताळ साजरा करताना दिवे, तारे, सजावट, केक आणि भेटवस्तू यांच्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे ते येशूच्या जन्मामागील संदेश समजून घेणे व तो आपल्या जीवनात उतरवणे.**



नाताळच्या घटनेत आपल्याला दिसते ती देवाची विलक्षण नम्रता. सर्वशक्तिमान देवाने राजवाड्यात नव्हे, तर साध्या गोठ्यात जन्म घेणे पसंत केले. ही घटना मानवाला मोठा धडा देते की, खरे महानत्व ऐश्वर्यात नसून साधेपणात, नम्रतेत आणि सेवेत आहे. गोठ्यात जन्मलेला येशू मानवाला सांगतो की देव गरीब, दुर्बल आणि उपेक्षितांच्या जवळ असतो. नाताळ आपल्याला माणसाची किंमत त्याच्या पदाने किंवा संपत्तीने नव्हे, तर त्याच्या हृदयातील प्रेमाने ठरते हे शिकवतो

नाताळचा पहिला मोठा संदेश म्हणजे माणुसकी. येशूचा संपूर्ण जीवनप्रवास माणुसकीचा आदर्श आहे. तो रोग्यांच्या जवळ गेला, उपाशीजनांना अन्न दिले, पापी समजल्या जाणाऱ्यांना स्वीकारले आणि समाजाने टाकलेल्या लोकांना सन्मान दिला. नाताळ आपल्याला आठवण करून देतो की प्रत्येक माणूस देवाचा प्रिय आहे. जाती, धर्म, भाषा, श्रीमंती किंवा गरीबी यांपलीकडे जाऊन माणसाला माणूस म्हणून पाहणे हीच खरी माणुसकी आहे. आजच्या काळात जिथे स्वार्थ, स्पर्धा आणि द्वेष वाढताना दिसतो, तिथे नाताळ आपल्याला परस्पर काळजी घेण्यास, सहवेदना दाखवण्यास आणि एकमेकांसाठी उभे राहण्यास शिकवतो.


नाताळचा दुसरा महत्त्वाचा संदेश म्हणजे क्षमा. येशू ख्रिस्तांचे संपूर्ण जीवन क्षमेचा संदेश देते. एकमेकांची क्षमा करा, हा त्याचा मूलभूत संदेश होता. क्रूसावर लटकले असतानाही त्याने आपल्या शत्रूंना क्षमा केली. नाताळच्या बालक येशूमध्ये आपण पाहतो ती भविष्यातील क्षमाशील प्रवृत्तीची सुरुवात. क्षमा ही कमकुवतपणाची नव्हे, तर सामर्थ्याची खूण आहे हे नाताळ आपल्याला शिकवतो. आजच्या जीवनात तुटलेली नाती, मनातील कटुता, सूडभावना आणि अहंकार आपल्याला आतून पोखरतात. नाताळ आपल्याला सांगतो की क्षमेद्वारेच मनाला शांती, नात्यांना नवजीवन आणि समाजाला स्थैर्य मिळते.



नाताळचा तिसरा महत्त्वाचा संदेश म्हणजे दया. येशूने आपल्या जीवनातून दयेचे उदाहरण दिले. भुकेल्यांना अन्न, नग्नांना वस्त्र, आजारी लोकांना आरोग्य आणि हताशांना आशा देण्याचे काम त्याने केले. नाताळ हा दुसऱ्याच्या वेदना ओळखून त्यावर फुंकर घालण्याचा दिवस आहे. दया म्हणजे केवळ सहानुभूती नव्हे, तर प्रत्यक्ष कृती आहे. गरीब, अनाथ, वृद्ध, रुग्ण आणि एकाकी लोकांपर्यंत पोहोचणे, त्यांच्या गरजा ओळखून मदतीचा हात देणे हेच नाताळचे खरे साजरीकरण आहे

नाताळचा सण आपल्याला देतो तो एकतेचा संदेश. येशूचा जन्म कोणत्याही एका समाजापुरता मर्यादित नव्हता. मेंढपाळ, ज्ञानी पुरुष, गरीब आणि श्रीमंत सर्व जण त्या बालकाजवळ आले. हा प्रसंग दाखवतो की येशू सर्वांचा आहे. नाताळ आपल्याला विभाजनांवर मात करून एकतेकडे नेतो. आज जगात युद्धे, संघर्ष, धार्मिक व सामाजिक तणाव पाहायला मिळतात. अशा वेळी नाताळ आपल्याला शांततेचा मार्ग दाखवतो आणि सांगतो की प्रेम हेच सर्व समस्यांचे उत्तर आहे.

नाताळ साजरा करताना आपण अनेक बाह्य गोष्टींमध्ये गुंतून जातो, परंतु त्यामागील अंतर्गत संदेश कधी कधी विसरतो. नाताळ म्हणजे फक्त एक दिवस नव्हे, तर एक जीवनपद्धती आहे. दररोज आपल्या कृतीतून माणुसकी, क्षमा आणि दया प्रकट झाली पाहिजे. घरात, कामाच्या ठिकाणी, समाजात आणि चर्चमध्ये आपण हा संदेश जिवंत ठेवायला हवा. आपली वाणी सौम्य असावी, कृती प्रेमळ असाव्यात आणि मन दयाळू असावे. आजचा मानव आधुनिक तंत्रज्ञानात प्रगत झाला आहे, पण माणुसकीच्या बाबतीत कधी कधी मागे पडतो. नाताळ आपल्याला थांबून आत्मपरीक्षण करण्यास सांगतो. आपण इतरांसाठी किती संवेदनशील आहोत? आपण सहज माफ करतो का? गरजूंसाठी आपले हृदय उघडे आहे का? या प्रश्नांची उत्तरे शोधताना आपण नाताळच्या खऱ्या अर्थाकडे पोहोचतो. नाताळचा संदेश काळाच्या बंधनात बांधलेला नाही. तो आजही तितकाच महत्त्वाचा आहे जितका दोन हजार वर्षांपूर्वी होता. येशूचा जन्म आपल्याला सांगतो की अंधार कितीही दाट असला, तरी प्रकाशाची एक छोटी ज्योतही मोठा फरक घडवू शकते. माणुसकी, क्षमा आणि दयेच्या छोट्या कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवू शकतात.



ब्र.गणेश पवार,
ता. राहुरी, जि. अहमदनगर
८७९६२५७१७३

शेवटी असे म्हणता येईल की नाताळ हा देवाच्या प्रेमाचा उत्सव आहे. हा सण आपल्याला स्वत:पुरते जगणे सोडून इतरांसाठी जगायला शिकवतो. माणुसकीने जगणे, क्षमेद्वारे नाती जपणे आणि दयेने समाज घडवणे हाच नाताळचा खरा संदेश आहे. जर आपण हा संदेश मनापासून स्वीकारून आपल्या दैनंदिन जीवनात उतरवला, तर खऱ्या अर्थाने नाताळ आपल्या जीवनात साकार होईल.

# शाळेने मला काय दिले?

**वस्तू नव्हे परंतु मुनष्य हे माझ्या अहमदनगर बॉईज हायस्कूलचे ब्रीदवाक्य...! शालेय जीवनात या वाक्याचा अर्थबोध होत नव्हता. परंतु जसे जसं आपण शैक्षणिकदृष्ट्या परिपक्व होत जातो, तसं तसं याचा अर्थ मानवतेच्या दृष्टीने किती महत्त्वाचा आहे ते कळू लागते.**

माझी ही मराठी माध्यमाची शाळा तशी स्वातंत्र्यपूर्व कालावधीमधील ख्रिश्चन मिशनरी वर्गानी १०० वर्षांपूर्वी सुरू केलेली होती. मिशनरी वर्गाची त्यागाची भावना, मानवतेचा दृष्टिकोन, जात, धर्म याचा भेदा-भेद तसेच गरीब-श्रीमंत याची वर्गवारी नव्हती, हे शाळेचे वैशिष्ट्य.

मी शाळेत ५ वी ते ११ वी पर्यंत (जुनी एसएससी) शिक्षण घेतले. त्यामुळे शाळेने मला सामाजिक दृष्टिकोन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, मानवतावाद, विविध धर्माच्या संकल्पना यांचे धडे दिले होते. नाताळ हा ख्रिश्चन धर्मियांचा मोठा सण. या सणानिमित्त गरीब विद्यार्थी वर्गास सहाय्याकरिता शुभ्रदेणगी एकत्र करण्यात येत होती. त्यामध्ये सर्व शिक्षकवर्ग, विद्यार्थी दान देत असत. त्यामुळे विद्यार्थी दशेतच आपण सण, उत्सव साजरे करत असताना आपले मित्र, शेजारी यांना सहाय्य करण्याचा, आनंदात सहभागी करून घेण्याचे बाळकडू मिळाले. त्यामुळे विद्यार्थिदशेत सामाजिक शिक्षणाचे धडे शाळेत मिळाले ही बाब महत्त्वपूर्ण आहे.

ज्येष्ठ, गुरुजनांबद्दल आदर, प्रसंगानुरूप जटिल प्रश्नांची सोडवणूक करण्याचा सकारात्मक दृष्टिकोन शाळेतूनच मिळाला. या शालेय शिक्षणामधून प्राप्त झालेल्या सकारात्मक विचारामुळे मी जरी पुढे राजपत्रित प्रशासकीय अधिकारी वर्ग-१ या पदावर काम केले, तरी त्यावेळी शाळेत घेतलेल्या उपयुक्त धड्यांमुळे अहंकार मनाला शिवला नाही. १९७२ या वर्षी एसएससी उत्तीर्ण होऊन पुढील शिक्षणासाठी शाळेचा निरोप घेतला. परंतु तेथील संस्कार, शैक्षणिक गुणवत्ता, सहाय्य करण्याची वृत्ती, आदरभाव, जीवनाच्या मार्गक्रमणावर उपयुक्त ठरला. त्यामुळे ३० वर्षांच्या प्रशासकीय सेवेचा संपूर्ण कालावधी यशस्वी झाला. प्रशासकीय सेवेत अनेक योजनांद्वारे, मार्गदर्शनाद्वारे नागरिकांना मदतीचा हात देऊन विकासात खारीचा वाटा देखील उचलता आला. या सर्व यशस्वितेच्या मार्गक्रमणामध्ये शाळेत शिकवलेला सामाजिक दृष्टिकोन उपयुक्त ठरला.



रफिक मुन्शी
अहमदनगर
9421478819

समाजभान

माझ्या मराठी शाळेने मला काय दिले नाही? हा प्रश्न जर मनाला विचारला, तर असे उत्तर येईल की काय दिले नाही? तुझ्या सर्वांगाच्या विकासाकरिता एका दगडास सुंदर व सुबक मूर्तीच्या रूपाने घडवलेले आहे असेच म्हणता येईल.

मला आठवतात मराठी भाषेचे मुळे सर, कडक शिस्तीचे. आमचा भाषेचा अभ्यास, मराठी भाषेचे व्याकरण, अलंकार, निबंध कसा लिहावा, याचे धडे त्यांनी दिले. त्यामुळेच भाषेचे सौंदर्य कळाले. तत्कालीन मुख्याध्यापक आर. एस. रणनवरे यांच्या प्रत्येक विषयाच्या धड्यामधील छोट्या-छोट्या प्रश्नांच्या उजळणी घेण्याच्या पद्धतीमुळे अधिकारी झाल्यावरही मुलाखती घेताना तीच पद्धत मला उपयोगी पडत होती. मुख्याध्यापक रणनवरे यांची शालेय साहित्याचा म्हणजे साबण, खडू, वह्या आदींचा कारखाना सुरू करून त्याद्वारे सर्व शाळांना व वसतिगृहांना मोफत साहित्य वाटप करावे, अशी इच्छा होती. मात्र, त्यांच्या आकस्मिक निधनामुळे हा प्रकल्प अपूर्ण राहिला. अशा प्रकारे माझ्या शाळेने मला जीवनाच्या प्रवासात यशस्वी पद्धतीने उभे केले. आजही एकोणसत्तराव्या वर्षाचे वय झाले, तरी शाळेच्या परिसराची, वर्ग खोल्यांची गुरुजनांची आठवण येऊन भावना दाटून येतात. आजही शाळेची दगड-विटांची सुंदर इमारत पहात असताना विद्यार्थी दशेतील पन्नास वर्षांपूर्वीच्या आठवणी बोलू लागतात, असा भास होतो. तो खालील ओळीप्रमाणे आहे.

**''सुनने की मोहलत मिले
तो, आवाँज हैं पत्थरों में,
उजडी हवी बस्तीयोंमे,
आबादीयाँ बोलती है,
कोई नहीं बोलता
जब, तनहाईयाँ बोलती
है...!!!''**

# ख्रिस्तजन्म : मानवतेला नवी दिशा देणारा दिव्य प्रकाश

**जगाच्या इतिहासात काही घटना केवळ काळाच्या चौकटीत बंदिस्त राहत नाहीत, तर त्या पिढ्यान्‌पिढ्या मानवजातीच्या विचारांना, मूल्यांना आणि जीवनशैलीला आकार देतात. प्रभु येशू ख्रिस्तांचा जन्म ही अशीच एक दिव्य व क्रांतिकारी घटना आहे. सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी बेथलेहेम या लहानशा गावात, एका साध्या गोठ्यात जन्माला आलेल्या त्या बालकाने संपूर्ण जगाला प्रेम, शांती, क्षमा आणि सेवाभावाचा संदेश दिला.**

ख्रिस्तांचा जन्म राजवाड्यात किंवा ऐश्वर्यात झाला नाही, तर अत्यंत साधेपणात आणि गरिबीच्या परिस्थितीत झाला. यामागे एक खोल आध्यात्मिक संदेश आहे. देवाची उपस्थिती वैभवात नव्हे, तर नम्रतेत आणि पवित्र मनात असते, हे ख्रिस्त जन्म आपल्याला शिकवतो. येशू ख्रिस्तांचा जन्म हा समाजातील शेवटच्या घटकासाठी गरीब, पीडित, उपेक्षित आणि अन्यायग्रस्त लोकांसाठी आशेचा किरण ठरला. त्या रात्री देवदूतांनी दिलेला संदेश ''पृथ्वीवर शांती आणि मनुष्यमात्रांवर देवाची कृपा'' हा आजही तितकाच जिवंत आणि अर्थपूर्ण आहे. हा संदेश केवळ एका धर्मापुरता मर्यादित नाही, तर संपूर्ण मानवतेसाठी आहे. ख्रिस्त जन्म हा सण म्हणून साजरा करण्यापेक्षा तो विचार म्हणून जगण्यातच त्याचे खरे सार आहे. प्रभु येशू ख्रिस्तांनी आपल्या संपूर्ण जीवनातून प्रेमाची व्याख्या नव्याने मांडली. शत्रूंवरही प्रेम करा, अन्याय सहन करतानाही सत्याचा मार्ग सोडू नका, आणि सूडाऐवजी क्षमेचा स्वीकार करा ही शिकवण आजच्या संघर्षमय जगासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले की खरा धर्म हा कर्मकांडात नाही, तर मानवसेवेत आहे.

आजचा समाज धार्मिक, सामाजिक आणि वैचारिक तणावांनी ग्रासलेला आहे. वाढती हिंसा, असहिष्णुता आणि विभाजनाची भावना माणसाला माणसापासून दूर नेत आहे. अशा परिस्थितीत ख्रिस्त जन्माचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. तो आपल्याला आठवण करून देतो की सर्व मानव समान आहेत आणि प्रत्येकाच्या जीवनाला प्रतिष्ठा व सन्मान मिळायला हवा.



मि. ब्र. प्रेम व्हीमल
रत्नागिरी
९१६८२६६३०९

ख्रिस्त जन्म आपल्याला सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देतो. भुकेल्याला अन्न देणे, नग्नाला वस्त्र देणे, आजारी व्यक्तीची सेवा करणे, दु:खी माणसाच्या अश्रूंना पुसणे हाच ख्रिस्ती विचारांचा गाभा आहे. समाजात शांतता, न्याय आणि बंधुता निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने प्रयत्न करणे हीच ख्रिस्त जन्माची खरी उपासना आहे. ख्रिसमस हा केवळ उत्सव, सजावट किंवा भेटवस्तूंचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपल्या जीवनात आपण प्रेम किती पेरले, क्षमा किती दिली आणि सत्यासाठी किती उभे राहिलो, याचा विचार करण्याची ही संधी आहे. जेव्हा आपण अंतःकरणातील अहंकार, द्वेष आणि अन्याय दूर करतो, तेव्हाच ख्रिस्त जन्माचा खरा आनंद अनुभवता येतोआजही ख्रिस्त जन्माचा प्रकाश अंधारलेल्या जीवनात आशा निर्माण करतो. निराश माणसाला धीर देतो, तुटलेल्या नात्यांना जोडतो आणि मानवतेवर विश्वास पुन्हा प्रस्थापित करतो. म्हणूनच ख्रिस्त जन्म हा केवळ एका दिवशी साजरा करण्याचा सण नसून, तो रोज जगण्याचा विचार आहे. या पवित्र ख्रिसमसच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या जीवनात प्रेम, शांती, न्याय आणि करुणा यांना स्थान द्यावे. कारण प्रभु येशू ख्रिस्तांचा जन्म हा मानवतेसाठी दिलेला देवाचा अमूल्य वरदान आहेजो आजही, आणि सदैव, जगाला उजळवणारा दिव्य प्रकाश ठरत आहे.

# प्रभू येशूच्या जन्माची नाताळची गोष्ट



**खूप खूप वर्षांपूर्वी, नाझरेथ नावाच्या गावात मरियम नावाची एक सुंदर आणि दयाळू स्त्री राहायची. ती जोसेफ नावाच्या सुताराशी लग्नाची तयारी करत होती. एके दिवशी देवाने गॅब्रिएल नावाच्या देवदूताला मरियमकडे पाठवले. देवदूताने मरियमला सांगितले, ''घाबरू नकोस, देव तुझ्यावर प्रसन्न आहे. तू लवकरच एका मुलाला जन्म देणार आहेस, आणि त्याचे नाव येशू ठेव. तो जगाचा तारणारा असेल!''**

मरियम आणि जोसेफला ही बातमी ऐकून आश्चर्य वाटले, पण त्यांनी देवाच्या इच्छेला मान दिला. त्याच वेळी, रोमन सम्राटाने आज्ञा काढली की सर्व लोकांनी आपापल्या गावी जाऊन नावनोंदणी करावी. म्हणून जोसेफ आणि मरियम नाझरेथहून बेथलेहेमला निघाले. प्रवास खूप लांब आणि कष्टाचा होता. मरियम गरोदर होती, तरीही ती धैर्याने चालत होती. बेथलेहेमला पोहोचल्यावर त्यांना राहण्यासाठी जागा मिळाली नाही. सगळी हॉटेल्स आणि घरे भरलेली होती. शेवटी एका गोठ्यात त्यांना आश्रय मिळाला. त्या रात्री मरियमला मुलगा झाला प्रभू येशू ख्रिस्त!



**अंजला नवगिरे अब्राहम**
सहाय्यक सरकारी अभियोक्ता, नाशिक

जोसेफने येशूला कपड्यात गुंडाळले आणि एका पाळण्यात म्हणजे गोठ्यातील खुराड्यात ठेवले. त्या रात्री आकाशात एक तेजस्वी तारा चमकला. दूरवर मेंढपाळ शेतात मेंढ्या राखत होते. अचानक देवदूत त्यांच्यासमोर प्रकट झाले आणि म्हणाले, ''घाबरू नका! मी तुम्हाला आनंदाची बातमी सांगतो. आज बेथलेहेममध्ये तुमचा तारणारा जन्मला आहे!'' मग आकाशात देवदूतांचा समूह दिसला आणि ते गात होते, ''देवाला महिमा आणि पृथ्वीवर शांतता!'' मेंढपाळ गोठ्यात गेले आणि येशूला पाहिले. ते खूप आनंदले आणि ही बातमी सर्वांना सांगितली. हाच दिवस नाताळ (Christmas) हा २५ डिसेंबर रोजी साजरा होणारा येशू ख्रिस्ताचा जन्मदिन आहे, जो प्रेम, शांती आणि आनंदाचा सण आहे, ज्यात लोक घरे सजवतात, भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात, कॅरोल गातात आणि एकत्र जेवण करतात, जो ख्रिसमसच्या १२ दिवसांच्या पर्वाची सुरुवात करतो.

नाताळ, ज्याला ख्रिसमस असेही म्हणतात, हा जगभरात साजरा होणारा एक प्रमुख सण आहे, जो दरवर्षी २५ डिसेंबर रोजी येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो. हा सण ख्रिस्ती धर्मातील लोकांचा सर्वात मोठा आणि आनंदाचा सण आहे, पण त्याची मजा आणि उत्साह सर्वधर्मीय लोक अनुभवतात. ख्रिस्ती धर्मानुसार, येशू ख्रिस्त यांचा जन्म बेथलेहेम येथील एका गोठ्यात झाला. त्यांच्या जन्माच्या वेळी आकाशात पूर्व दिशेला एक तेजस्वी तारा उगवला होता, असे बायबलमध्ये सांगितले आहे. त्यांच्या जन्माच्या आनंदात तीन राजे (मॅजाय) सोने, लोबान आणि गंधरस घेऊन त्यांना भेटायला आले होते. हीच नाताळच्या मूळ कथेचा भाग आहे. हा सण प्रेम, दयाळूपणा, शांती आणि एकमेकांना मदत करण्याचा संदेश देतो. लोक आपली घरे आणि चर्च दिव्यांनी, रंगीबेरंगी पताकांनी आणि नाताळच्या झाडाने (Christmas Tree) सजवतात, गव्हान सजवतात. कुटुंब आणि मित्र एकमेकांना भेटवस्तू देतात. या दिवशी खास पदार्थ बनवले जातात आणि एकत्र जेवण केले जाते. प्रार्थना मंदिरे, चर्चमध्ये आणि घरांमध्ये ख्रिस्ती भजने (कॅरोल) गायली जातात. येशू ख्रिस्ताच्या जन्माचा आनंद साजरा करण्यासाठी प्रार्थना केल्या जातात. नाताळ हा केवळ ख्रिस्ती धर्माचा सण नसून तो सर्व जगाला एकत्र आणणारा, प्रेम आणि आनंदाचा संदेश देणारा सण आहे. हा सण आपल्याला एकमेकांबद्दल आदर, सहानुभूती आणि प्रेम शिकवतो. हा उत्सव नवीन वर्षाच्या उत्साहाची सुरुवात करतो आणि वातावरणात एक खास सकारात्मक ऊर्जा भरतो. याच सणा पासून इसवी सनाची सुरुवात झाली. आपणास या नाताळ सणाच्या निमित्ताने खूप खूप शुभेच्छा प्रभु येशु ख्रिस्ताची शांती तुमच्या सोबत असो..



**संकलन –**
**शफीक बागवान,**
पत्रकार, श्रीरामपूर








इव्हँजेलिन बूथ हॉस्पिटल येथील सजावट

# समाजसुधारक संतकवी- रेव्हरंड ना.वा. टिळक

**अहमदनगर म्हणजे आजच्या अहिल्यानगरमध्ये १९-२० व्या शतकात रेव्हरंड नारायण वामन टिळक नावाचे थोर संतकवी आणि समाज सुधारक होऊन गेले. रेव्हरंड टिळकांचा सर्वाधिक सेवाकाळ नगरमध्ये व्यतित झाला. प्लेगच्या महामारीत त्यांनी इथल्या दीनदुबळ्यांची सेवा केली, दुष्काळात अनेक निराधार बालकांचा सांभाळ केला, त्यांना शिकवलं. तेव्हाचे दिवस, सतत येणाऱ्या अडचणी, त्यावर टिळकांनी केलेली मात याचं वर्णन त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रे या आत्मचरित्रात वाचायला मिळतं.**

फुलां-मुलांचे कवी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रेव्हरंड टिळकांनी विपुल लेखन केलं. ते शीघ्रकवी होते. चर्चमध्ये प्रवचन देता देता त्यांना कवनं स्फुरत. येशू ख्रिस्ताला मराठी मातीत आणि मराठी मनात रूजवलं ते रेव्हरंड टिळकांच्या अभंगांजलीनंच. पूर्वी इंग्लिश किंवा लॅटिनमध्ये होणाऱ्या प्रार्थनांचा मराठीत अनुवाद करून त्या चर्चमध्ये म्हटल्या जाऊ लागल्या. टिळकांनी अगदी मराठमोळ्या पद्धतीनं अभंग लिहिले. संत तुकारामांचा मोठा प्रभाव त्यांच्या रचनांवर जाणवतो. पौर्वात्य वाद्यांएवजी टाळ, मृदंगाच्या साथीनं ते प्रवचन करत. आणि हे सगळं इथल्या म्हणजे नगरच्या भूमीत झालं. नगरला महाराष्ट्रातलं जेरूसलेम म्हणतात, ते कदाचित त्यामुळंच. ख्रिस्ती धर्माचं मराठीकरण, भारतीयकरण करण्याचं श्रेय टिळकांकडे जातं. त्यांची पद आजही जगभरातील मराठी ख्रिस्ती मंडळी म्हणत असतात.

रामायण जसं भारतात घरोघरी पोहोचलं आहे, तसंच येशू खिस्त सर्वांपर्यंत पोहोचावा, यासाठी रामायणाच्या धर्तीवर निरूपण करता येईल, असं ख्रिस्तायन लिहायला रेव्हरंड टिळकांनी सुरूवात केली होती. त्यांच्या निधनामुळं अधुरं राहिलेलं हे काम त्यांची पत्नी लक्ष्मीबाई आणि नंतर देवदत्त टिळकांनी पूर्ण केलं.

रेव्हरंड टिळकांनी नगरमधून सुरू झालेलं पहिलं नियतकालिक ज्ञानोदयचं संपादक म्हणून काही वर्षे काम पाहिलं. बालगोपाळांसाठी बालबोधमेवा नावाची स्वतंत्र पुरवणी त्यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीत पहिल्यांदा सुरू केली. ते स्वतः शीघ्रकवी होतेच, शिवाय बालकवी त्र्यंबक बापुजी ठोंबरेंमधील प्रतिभा ओळखून ती फुलवण्याचं कामही त्यांनी केलं. रेव्हरंड टिळक आणि लक्ष्मीबाई या साहित्यिक दांपत्याच्या छत्रछायेत नगरला बराच काळ राहिलेल्या बालकवींनी बालबोधमेवात अनेक कविता लिहिल्या. नगरनं आणि टिळकांनी पोटच्या लेकरासारखं अत्यंत जिव्हाळ्याचं नाते बालकवींशी जपलं.

नगरच्या माळीवाडा भागातील टिळकवाडीत रेव्हरंड ना. वा. टिळक आणि लक्ष्मीबाई रहात असत. त्याच्यामागे बोरीचं झाडं होतं. जीर्ण झालेलं कौलारू घरं काही वर्षांपूर्वी काळाच्या पडद्याआड गेलं. टिळकांच्या आठवणी जपणारं ह्यूम मेमोरिअल चर्च खिस्तगल्लीत उभं आहे. ९ मे १९१९ रोजी टिळकांचं निधन झाल्यानंतर मुंबईत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. टिळकांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थी सप्टेंबर महिन्यात त्यांच्या आवडत्या नगरमध्ये आणण्यात आल्या. ह्यूम चर्चपासून मिरवणूक काढून भजनं म्हणत लालटाकी रस्त्यावर करंदीकर हॉस्पिटलच्या अलिकडे असलेल्या ख्रिस्ती दफनभूमीत या अस्थी पुरण्यात आल्या. टिळकांनी काही गोष्टी सांगून ठेवल्या होत्या. ''माझ्या नावापुढे रेव्हरंड किंवा अन्य कुठलीही उपाधी लावू नये'', अशी त्यांची इच्छा होती. या कबरेवर असलेल्या शिलालेखात केवळ नारायण वामन टिळक असा उल्लेख आहे. त्यांच्या आवडत्या कवितेतील ''पुष्कळ अजुनी उणा प्रभु मी पुष्कळ अजुनी उणा...'' या ओळी, तसंच तेव्हाच्या रविकिरण मंडळातील आघाडीचे कवी माधव ज्युलियन यांच्या काव्यपंक्ती या संगमरवरी शिळेवर कोरण्यात आल्या आहेत.काही वर्षांपूर्वी टिळकांच्या पणती मुक्ताताई टिळक नगरला आल्या होत्या. पणजोबांच्या समाधीचं दर्शन घेतल्यानंतर गप्पा मारताना त्या म्हणाल्या ''माझी पणजी लक्ष्मीबाई टिळकांचं देहावसान नाशिकमध्ये झालं. तिच्या समाधीची किंवा कबरीची नक्की जागा आम्हाला ठाऊक नव्हती. नगरचे ज्येष्ठ इतिहास संशोधक सुरेश जोशी आणि माझ्या वडिलांनी या समाधीची जागा शोधून काढली. नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाने पुढाकार घेऊन नगरमध्ये जशी नारायण वामन टिळकांची कबर आहे, तशीच आणि त्या आकाराची कबर नाशिकमध्ये बांधली.''



**भूषण देशमुख**
९८८१३३७७७५

१९९७ मध्ये नगरला झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या वेळी लालटाकी परिसरातील कब्रस्थानातील टिळकांची समाधीची जागा साफ करून रंगरंगोटी करण्यात आली. फुलांची सजावट केली गेली, पण नंतर पुन्हा टिळक आणि त्यांची समाधी विस्मरणात गेली. मराठी भाषेला अभिजात बनवण्यात रे. टिळकांसारख्या अनेकांचं मोठं योगदान आहे. या कवीला आदरांजली वाहण्यासाठी मध्यंतरी त्यांच्या स्मृतिदिनी लालटाकीवरच्या कब्रस्तानात गेलो. तिथं बरीच मंडळी दिसली, पण त्यात कुणी साहित्यिक किंवा रसिक नव्हता. कबरींशेजारच्या मोकळ्या जागेत ते गोळाफेकीचा खेळ खेळत होते.


नगरसाठी मोठं योगदान देणारे ह्यूम, फेअरबँक, मोडक, स्टँटन यांच्या कबरीही इथं आहेत. नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयानं जसा पुढाकार घेतला, तसं नगरमधील वाचनालयांना, महाराष्ट्र साहित्य परिषदेला नक्की करता येईल. या संतकवीच्या नावाचा फलक नव्याने सुशोभित होत असलेल्या लालटाकी चौकात आणि दफनभूमीच्या बाहेर लावायला हवा. नगरमधील कवींनी कधी तरी एकत्र जमून समाधीच्या परिसरात कविसंमेलन घ्यायलाही हरकत नाही... टिळकांच्या समाधीपर्यंत आता सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता झाला आहे. काही अंतरावर चाफा, आकाशमोगरा आणि गुलमोहोराचं झाड आहे. वाऱ्याबरोबर त्यांची फुलं कधीतरी या फुला-मुलांच्या कवीच्या समाधीवर येऊन पडतात. या कवीला आणखी काय हवंय...?

## महाराष्ट्रात मराठी ख्रिस्ती समाजात गायले जाणारे हे जुने पद्य

*तेजस्वी ताऱ्या तू ये उदयाला*
*दूर कराया निबिड अंधार*
*येशूची वाट दिसावी अम्हाला*
*दृष्टी पडावा तो जग उध्दार ।।१।।*
*जागा मिळेना त्या बाळ येशूला*
*गोष्ठीत ठेवती कर्ता महान*
*येउनी दूत समर्थ प्रभूला*
*गाऊनी स्तोत्रे देताती सन्मान ।।२।।*
*सोने की रत्ने ही अर्पणे व्यर्थ*
*प्रेम अर्पावे ते आवडे फार*
*ख्रिस्त गणी की हा श्रेष्ठ पदार्थ*
*दिनांच्या प्रार्थना प्रिय अपार ।।३।।*



सेंट सेव्हियर्स कॅथेड्रल, नाशिक धर्मप्रांत (CNI) येथे नाताळ सणानिमित्त करण्यात आलेली विद्युत रोषणाई



नाताळ सणानिमित्त व अहमदनगर पहिली मंडळी (नाशिक धर्मप्रांत, सीएनआय) चर्चच्या वर्धापनदिनानिमित्त केलेली विद्युत रोषणाई







